सकाळ
रविवार,
१४ डिसेंबर २०१४

# कविता टिपता यायला हवी

## विष्णू सूर्या वाघ : दोडामार्ग येथे काव्य मैफल

दोडामार्ग, ता. १३ : कविता ही आपल्या अवती भवतीच, प्रत्येक गोष्टीत असते; पण ती टिपता आली पाहिजे. तशी नजर आपल्याकडे असायला हवी तरच आपण कविता लिहू शकतो, असे उद्‌गार गोमंतकातील सुप्रसिद्ध कवी व आमदार विष्णू सूर्या वाघ यांनी येथे काढले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयमधील मराठी भाषा व वाङःमय मंडळातर्फे काव्य मैफलीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यात मराठी साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी, या हेतूने महाविद्यालयात मराठी भाषा दिन व वाङःमय मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कवितेविषयी गोडी निर्माण व्हावी, यासाठी मराठी, कोकणी व मालवणी 'काव्य मैफील' आयोजली होती. ते पुढे म्हणाले, ''कविता ही आपल्या जगण्यातून आली पाहिजे. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीत कविता असते. आपल्या अवती-भवती ती वावरत असते. फक्त तिला पहायला शिकले पाहिजे. सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेतले तरच कविता होऊ शकते.''

प्रिंटिंग प्रेसवाला, बेकरीवाला व भाजीवाला आपल्याकडील उपलब्ध साहित्याचा वापर करून प्रेमावर कविता कशी करतील? 'माझं काळीज प्रिंटिंग मशिन, तू माझी इंपोर्टेड शाई, छापायला गेलो तुझे नाव- जाई, पण प्रूफरीडर झोपला, अन् छापून आले ताई' तसेच 'वटवृक्षाची जशी सावली, तशीच असते आई, आई म्हणजे अपार डोंगर, मेहनत अन् कष्टाचा' ही आई वरची कविता ऐकून सारेच भावूक झाले.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी श्री. वाघ यांचा सत्कार केला. यावेळी भाई परमेकर, विवेकानंद नाईक, सूचन कोरगावकर, ॲड. प्रवीण नाईक, प्रेमप्रकाश नाईक, चंद्रकांत गावस, पत्रकार गिरीश नाईक आदी उपस्थित होते. प्रा. दिलीप बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जाधव यांनी आभार मानले.